बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०४ फेब्रुवारी २०२४**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६५/२०२४ भादवि ३७९,५११ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०३/०२/२०२४ रोजी १६.०० वा चे सुमारास, जुनी मिल कंपाऊंड, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी १७.३५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शत्रुघ्न गुरुनाथ माने, वय- ३६ वर्षे, रा. १,२,३, केकडे नगर, मुळेगाव रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | इम्रान अब्दुलगणी शेख, वय- ३७ वर्षे, रा. मुदगल बगीच्याचे बाजुला, पाथरुट चौक, सोलापूर |
| **गेला माल** | : | ५८०/- रु रोख रक्कम व चॉकलेट रंगाचे पाकीट |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.श्री. अजित पवार हे वरील ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे संपर्क कार्यालयाचे उद्धाटन कार्यक्रमादरम्यान, यातील वरील आरोपीताने गर्दीचा फायदा घेवून फिर्यादीच्या पॅन्टच्या मागील खिशातील नमुद रोख रक्कम असलेले पाकीट घेवून पळुन जावून चोरी करण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आला आहे म्हणून. तपासः- पोना/ १४२२ ढोबळे- ८०८७४०३०५० |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४५/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०२/०२/२०२४ रोजी ०३.१० वा ते ०३.३० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घराजवळुन, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी २२.२४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गणेश सिद्राम गोली, वय- ५३ वर्षे, रा. ८९१/९२, न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु एक काळया व लाल रंगाची हिरो होंडा फॅशन प्लस मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ ए के ७२३८ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ४४ शेख- **९८६०५२३८४६** |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६/२०२४ भादवि २७९,३३७,३३८, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३१/०१/२०२४ रोजी २२.०० वा चे सुमारास, यशोधरा हॉस्पीटल समोर चौकात, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी २३.५९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विजय सुंदरराव वाघमारे, वय- ६५ वर्षे, रा. ११०, सिध्देश्वर पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एम एच १३ बी सी ९३४५ चा अज्ञात चालक |

| | | |
|---|---|---|
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे कामावरुन घरी चालत जात असताना वरील ठिकाणी आले असता मागुन येणारी वरील क्रंमांकाची कार चा अज्ञात चालक याने त्याचे ताब्यातील कार ही हयगयीने, बेदरकारपणे, चालवून फिर्यादीस धडक देवून, खाली पाडुन सदर कारचे चाक हे फिर्यादीचे उजव्या नडगीवरुन घालुन गंभीर रित्या जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२०३ जाधव- |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४२/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ३०/०४/२०१६ रोजी ते दि. ०८/१२/२०२३ रोजी पर्यंत फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी १८.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आफ्रिन मजहर शेख, वय- २५ वर्षे, रा. सध्या- २४, भारत नगर, संभाजी शाळेमागे, जुना विडी घरकुल, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) मजहर शेख- पती, २) मलयका महिबुब शेख- सासु, ३) अन्वर शेख- दिर, ४) अजहर शेख- दिर, ५) निखत अन्वर शेख- जाऊ, ६) तब्बसुम अजहर शेख- जाऊ, सर्व रा. आनंद नगर, पोस्ट ऑफिस जवळ, लातुर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या सासरी नांदत असताना यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस तुझ्या आई वडीलांनी आम्हाला मनाप्रमाणे हुंडा दिला नाही, लग्नात काही मान पान केला नाही, आम्हाला फर्निचर दुकान टाकायचे आहे त्याकरीता ५ ते ६ लाख रुपये घेऊन ये नाही तोपर्यंत आम्ही तुला अश्याच प्रकारे त्रास देणार, व्यवस्थित नांदवणार नाही, असे म्हणून जाचहाट करुन मानसीक, शारिरीक त्रास देवून, शिवीगाळ मारहाण करुन घरातुन हाकलुन दिले आहे, तसेच फिर्यादी गरोदर असताना घरातील सर्व कामे करण्यास लावुन उपाशी पोटी ठेवून, तसेच टोचून बोलुन त्रास दिला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ५१२ गायकवाड- ९६२३३१०२२२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४४/२०२४ भादवि ३९२,४५२,३३६,५०४५,५०६, शस्त्र अधिनियम कलम ४,२५ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०२/०२/२०२४ रोजी १६.३० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी १४.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | महेश बाबुराव बनसोडे, वय- ३८ वर्षे, रा. ९४/२४२, जोडभावी पेठ, नेताजी नगर, कन्ना चौक, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | विनायक दत्तात्रय नारबंडी |
| **गेला माल** | : | १,०००/- रुपये रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीची पत्नी व दोन मुले असे घरी असताना, यातील वरील आरोपीत हा फिर्यादीचे घरात घुसुन घरातील सर्वांना शिवीगाळ करुन, त्याचे हातात आणलेल्या तलवारीचा धाक दाखवुन, बळजबरीने फिर्यादीचे शर्टाच्या खिशातील १,०००/- रु रोख रक्कम काढुन घेतली आहे. तसेच दुपारी १२.४५ वा चे सुमारास, हातात तलवार घेवून कन्ना चौक येथील दुकानदार यांना पैशांची मागणी करुन त्यांचे दुकानावर दगड फेकुन, दहशत निर्माण केली आहे म्हणून. तपासः- पोसई- ताकभाते- **९८८४६४९१७८** |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४५/२०२४ भादवि २७९,३३७,४२७, मोवाकाक १७७,१८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०३/०२/२०२४ रोजी ०१.३० वा चे सुमारास, मधला मारुती चौक ते बलीदान चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी १६.३४ वा. |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सतिश रामचद्र जाधव, वय- २७ वर्षे, रा. वडार गल्ली, बुधवार पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | मारुती स्विफ्ट डिझायर वाहन क्रं. आर जे ४० सी ए १६७९ चा अज्ञात चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे रिक्षा क्रं. एम एच १३ सी टी ७६७५ यात प्रवासी १) इरण्णा फकरे, २) मल्लिकार्जुन चेंडके, ३) भिमाशंकर शिवशेट्टी यांना एस टी स्टॅन्ड येथुन मधला मारुती चौक मार्गे, अक्कलकोट रोड कडे जात असताना, नमुद ठिकाणी यातील वरील आरोपीत वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने, रहदारीकडे लक्ष न देता चालवून, फिर्यादीचे रिक्षास धडक दिल्याने रिक्षा पलटी होवून, त्यात फिर्यादीचे डोक्याचे डावे डोळयास व सर्वांगास मार लागुन दुखापत झाली आहे. तसेच रिक्षातील प्रवासी यांना मुकामार लागुन दुखापत झाली आहे. तसेच रिक्षाचे समोरील काच फुटुन, समोरील बाजुस चेमटुन व उजव्या बाजुचे दरवाजा चेमटुन सुमारे १५ ते २० हजार रु चे नुकसान झाले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ८३६ भोगशेट्टी- ८८८८२३३९३३ |